शिक्षणमंडळ कार्यालय,पुणे महानगरपालिका,
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना
शिवाजीनगर पुणे ४११ ००५.
जा.क्र./खाप्राशा/ ५०७९
दि. १७/७/०५

शाळाप्रमुख.
प्रगती विद्यालय
आनंदनगर, हिंगणे खुर्द,
सिंहगड रोड पुणे -५१

विषय - खाजगी अनुदानित/विनाअनुदानित/प्राथमिक शाळांना सन २००१-२००२ यावर्षी इ. नैसर्गिक वर्ग वाढीचे/अतिरिक्त तुकडया मंजूर करणेबाबत.
संदर्भ - मा. शिक्षण उपसंचालक यांचेकडील जा.क्र.//प्रा.प्राशि२/खाप्राशा/मान्यता/पुवि दि. ७.१०.२००३ चे पत्र.

उपरोक्त संदर्भांकित पत्रान्वये तुमचे शाळेस खाली दर्शविण्यात आलेल्या जादा नैसर्गिक वाढीचा/प्रथम/जादा तुकडयांचा वर्ग सन २००१-०२ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून विनाअनुदान तत्वावर मंजूरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ जादा/नैसर्गिक | मंजुरीचे वर्ष |
|---|---|---|---|---|
| १) | मराठी | ५वी | प्रथम | जून २००१. |
| २) | — | ७वी | प्रथम | जून २००३. |

**अटी व शर्ती :-**

१) सदर शाळेने तुकडयांसाठी सर्व भौतिक,शैक्षणिक व्यवस्थापन विषये सुविधा उपलब्ध करुन द्यावयास हव्यात.

..........२.....

२) शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे.

३) शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक शिक्षक उमेदवार शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधीन राहून नेमला पाहिजे.

४) सदर शाळेत स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.

५)सदर शाळेच्या तुकडीत विद्यार्थी संख्या निकषानुसार पुरेशी असणे आवश्यक आहे.

६)सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. अनैसर्गिक स्पर्धा करू नये.

शिक्षणप्रमुख,
शिक्षणमंडळ, पुणे महानगरपालिका

शिक्षणमंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका,
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना
शिवाजीनगर पुणे ४११ ००५.
जा.क्र./खाप्राशा/५०७१
दि. ११/७/०५

शाळाप्रमुख.
प्रगति विद्यालय,----
आनंदनगर, सिंहगड रोड, पुणे
-----------------

विषय - खाजगी ~~अनुदानित~~/विनाअनुदानित/प्राथमिक शाळांना सन २००१-२००२ यावर्षी इ. नैसर्गिक वर्ग वाढीचे/अतिरिक्त तुकडया मंजूर करणेबाबत.

संदर्भ - मा. शिक्षण उपसंचालक यांचेकडील जा.क्र.//प्रा.प्राशि२/खाप्राशा/मान्यता/पुवि दि. ७.१०.२००३ चे पत्र.

उपरोक्त संदर्भांकित पत्रान्वये तुमचे शाळेस खाली दर्शविण्यात आलेल्या जादा नैसर्गिक वाढीचा/प्रथम/जादा तुकडयांचा वर्ग सन २००१-०२ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ ~~जादा~~/नैसर्गिक | मंजूरीचे वर्ष |
|---|---|---|---|---|
| १) | मराठी | ६वी | प्रथम | जून २००२ |

*अटी व शर्ती :-

१) सदर शाळेने तुकडयांसाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व्यवस्थापन विषयी सुविधा उपलब्ध करुन द्यावयास हव्यात.

२ . . . . . . .

२) शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे.

३) शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक शिक्षक उमेदवार शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधीन राहून नेमला पाहिजे.

४) सदर शाळेत स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.

५)सदर शाळेच्या तुकडीत विद्यार्थी संख्या निकषानुसार पुरेशी असणे आवश्यक आहे.

६)सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. अनैसर्गिक स्पर्धा करू नये.

शिक्षणप्रमुख,

शिक्षणमंडळ, पुणे महानगरपालिका

शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/ स्वयंअशाळा/४५७/१८
पुणे १ दिनांक :२१/ ९ /२०१८

प्रति,

**अध्यक्ष/ सचिव/मुख्याध्यापक,**
**ज्ञानदा विद्या प्रसारिणी संचालित प्रगती विद्यालय हिंगणे खुर्द आनंदनगर सिहगड रस्ता पुणे**

**<u>विषय:-</u>** राज्यातील खाजगी प्राथमिक शाळांना इयत्ता ८ वी चा वर्ग सन २०१६-१७ व सन २०१७-१८ या वर्षापासून स्वयंअर्थ सहाय्यित तत्वावर जोडण्यास शासन मान्यता देणे बाबत

**<u>संदर्भ</u> :-**१. १ मा शिक्षण संचालक (प्राथमिक ) म.रा पुणे यांचे पत्र जा क्र खप्रशा २०१८ / वर्ग /८,७/ड ५१२/अ१ /६९५ दिनांक १७/२/२०१८ स्वयंअर्थ सहाय्यित ततवावर
२. शासन निर्णय क्र प्रशाव २०१७/ प्र अ /६०/एसएम ५ दिनांक १३/९/२०१७
३. शासन निर्णय क्र प्रशाव २०१७/ प्र अ /७३/एसएम ५ दिनांक १/११/२०१७
४.शासन निर्णय क्र प्रशाव २०१७/ प्र अ /६८/एसएम ५ दिनांक ६/११/२०१७
५.शासन निर्णय क्र प्रशाव २०१७/ प्र अ / ७८/एसएम ५ दिनांक १३/११/२०१७
६.शासन निर्णय क्र प्रशाव २०१७/ प्र अ /९७/एसएम ५ दिनांक २४/१/२०१८
७.शासन निर्णय क्र प्रशाव २०१७/ प्र अ /०९/एसएम ५ दिनांक ३०/१/२०१८

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने ज्ञानदा विद्या प्रसारिणी संचालित प्रगती विद्यालय हिंगणे खु आनंदनगर,सिंहगड रस्ता, जिल्हा- पुणे या शाळेस इ ८ वी चा वर्ग स्वयंअर्थ सहाय्यित तत्वावर जोडण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे .

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | वर्ग | मंजूर वर्ष | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ९ |
| १ | **ज्ञानदा विद्या प्रसारिणी संचालित** | **प्रगती विद्यालय हिंगणे खुर्द आनंदनगर सिहगड रस्ता पुणे** | मराठी | इयत्ता ८ वी | सन २०१६-१७ | २०१६-१७ |

**<u>अटी व शर्ती</u>**

१. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील तरतुदीनूसार भौतिक सोयी सुविधा व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करणे बंधनकारक राहील .
२.शाळेला वर्ग खोल्या उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधीत संस्थेची राहील .

३.संस्थेने वर्ग परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.
४.संदर्भ क्रमांक ०८ अन्वये सन २०१६-१७ मध्ये इ ८ वीच्या वर्गास परवानगी देण्यात येत आहे.
५.परवानगी देण्यात आलेल्या वर्ग शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.
**६.** शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता इ ८ वी चा वर्गाची स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.
**७** महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना**UDISE** मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.
**८.** शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

१ मा शिक्षण उपसंचालक, पुणे यांचेकडील आदेश क्र शिउस / प्राथ -२/ स्वयंशाळा / मान्यता /पुविद२३०/३१ दिनांक ३/८/२०१०

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**पुणे जिल्हा परिषद, पुणे**

**प्रत माहितीसाठी सविनय सादर-**
**१)मा. शिक्षण संचालक(प्राथमिक) महाराष्ट्र राज्य,पुणे-१.**